महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:१४७७/रासेमु/२०२३/सतरा दिनांक: ०२ फेब्रुवारी , २०२४.

**-: घोषणा :-**

**विषय:- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ या परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत...**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक २० ते २२ जानेवारी, २०२४** रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३** या परीक्षेच्या भाषा पेपर-२ (मराठी व इंग्रजी), सामान्य अध्ययन-I, सामान्य अध्ययन-II, सामान्य अध्ययन-III व सामान्य अध्ययन-IV या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या एकूण ५ प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावर **दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व दिनांक ०१ जुलै, २०२२** रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

३. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

५. ऑनलाईन पध्दतीने हरकती सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच, support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण : नवी मुंबई.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.